
# मशागत आमची, चैनी आयारामांची

## आयात विरुद्ध निष्ठावंत संघर्ष जाईल शिगेला

सोलापूर/प्रतिनिधी

**आगामी महापालिका आणि जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. विविध पक्षांमध्ये उमेदवारी मिळवण्यासाठी मोठी चुरस पाहायला मिळत आहे. ही चुरस आता निष्ठावंत विरुद्ध आयात अशा अंतर्गत संघर्षात रूपांतरित होण्याची शक्यता दिसत आहे. निष्ठावंतांचा वनवास संपणार तरी कधी?अशी हाक जुन्या कार्यकर्त्यांनी दिली आहे.**



दरम्यान पक्षवाढीसाठी आयुष्य वेचलेल्या कार्यकर्त्यांना पक्ष मोठा झाल्यावर आपल्याला सुगीचे दिवस येतील, अशी अपेक्षा होती, प्रत्यक्षात मात्र सुगीची फळे दुसऱ्या पक्षातून आयात झालेल्या कार्यकर्त्यांनाच मिळणार का? त्यामुळे हेची फळ काय मम तपाला ? अशी जुन्या कार्यकर्त्यांत भावना आहे.

पक्षासाठी अनेक वर्षं झटणाऱ्या कार्यकर्त्यांनी आता आक्रमक पवित्रा घेतल्याने, उमेदवारांची निवड करताना पक्षनेत्यांची मोठी दमछाक होणार आहे.

सर्वच पक्षांनी सत्तेसाठी कायपण? अशी भूमिका घेत निवडून येण्याची क्षमता असलेल्यांना उमेदवारी असे जाहीर केले आहे. राष्ट्रवादीचे नेते, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तर मिरजेतील जाहीर सभेत स्पष्टपणे ही भूमिका जाहीर केली आहे. साहजिकच निष्ठावान जुन्या कार्यकर्त्यांना आपण निवडून येण्याच्या क्षमतेचे आहोत का? याचा विचार प्रथम करावा लागणार आहे.

सोलापूर महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, भाजप, दोन्ही राष्ट्रवादी, दोन्ही सेना, काँग्रेस, माकप, रिपाइं पक्षांच्या मुलाखती नुकत्याच पार पडल्या. त्याामध्ये तुम्ही निवडून येण्याची क्षमता आहे का? हाच प्रश्न सर्व इच्छुकांना प्राधान्याने विचारला गेला. निवडणुकीसाठी मोठा खर्च येणार असल्याने तुम्ही किती पैसे खर्च करू शकता? हा प्रश्नही ठळकपणे विचारला गेला. या शर्यतीत निष्ठावान कार्यकर्ते कोठे दिसले हा मुद्दा लक्षवेधी ठरला.

गेल्या आठवडाभरात भाजपनं घेतलेल्या इच्छुकांच्या मुलाखतींत अन्य पक्षांतून आलेल्या आयात इच्छुकांचीच संख्या मोठी आहे. ज्या प्रभागांमध्ये आपली ताकद कमी आहे, तेथे बाहेरून येणाऱ्यांना संधी दिली जाण्याची शक्यता असल्याने मूळ कार्यकर्त्यांमध्ये धाकधूक वाढली आहे.





एकंदरीत निवडणुकीवेळीच नेमके तिकिट वाटप करताना निष्ठावंतांना योग्य तो न्याय न मिळाल्याने त्यांच्यामध्ये अन्यायाची भावना निर्माण होऊ शकते. त्यातूनची नाराजी मतपेटीत उमटेल असे चित्र आहे.

### सोशल मीडियावर निष्ठावंतांचे हाकारे

पक्ष संकटात असताना आम्ही सोबत होतो, आता सत्ता आणि सुगीचे दिवस आल्यावर बाहेरच्यांना संधी का? असा सवाल सोशल मीडियातून निष्ठावंत उपस्थित करीत आहेत. निष्ठावंत कार्यकर्त्यांना न्याय द्या, तिकीट मिले न मिले हम पक्षवाले, आणखी किती दिवस सतरंज्या उचलायच्या अशा आशयाच्या पोस्ट सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.

### निष्ठावंत झाले अस्वस्थ

सोलापुरातही अशीच परिस्थिती आहे. भाजपमध्ये होणाऱ्या वाढत्या इनकमिंगमुळे निष्ठावंत अस्वस्थ झाले आहे. प्रशासक लागल्यापासून आतापर्यंत लाखों रूपये सामाजिक कार्यासाठी आणि कार्यकर्त्यांवर खर्च केले आहेत. आता उमेदवारी मिळाली नाहीतर आता कसे करायचे, असा प्रश्न त्यांच्यासमोर आहे.



सोलापूर : पक्ष प्रवेशावेळी किसन जाधव, नागेश गायकवाड, चेतन गायकवाड यांच्यासह पालकमंत्री जयकुमार गोरे, आ. सचिन कल्याणशेट्टी व मान्यवर.

# किसन जाधवांसह नागेश गायकवाड भाजपमध्ये दाखल

## अजितदादांच्या राष्ट्रवादीला मोठा धक्का

सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली असून आता केवळ तीन दिवस शिल्लक राहिले आहेत. अशा निर्णायक टप्प्यावर भाजपमध्ये इन्कमिंगचा सिलसिला सुरूच असल्याचे चित्र दिसत आहे. बुधवारी रात्री होटगी रोडवरील एका खाजगी हॉटेलमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे माजी नगरसेवक किसन जाधव आणि नागेश गायकवाड यांनी आ. देवेंद्र कोठे यांचे नेतृत्वाखाली भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. हा पक्षप्रवेश पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत पार पडला.

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप आणि अजितदादा यांच्या राष्ट्रवादीमध्ये जोरदार हालचाली सुरू असतानाच या प्रवेशामुळे अजित पवार गटाला मोठा राजकिय धक्का बसला आहे. किसन जाधव आणि नागेश गायकवाड यांच्या भाजप प्रवेशामुळे प्र. २२ मधील राजकिय समिकरण पूर्णपणे बदलणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार पूनम गायकवाड यांचे पती अजित गायकवाड यांना अजितदादा यांच्या राष्ट्रवादीमध्ये प्रवेश दिल्याने किसन जाधव हे नाराज होते. पक्षातील अंतर्गत नाराजी आणि स्थानिक पातळीवरील निर्णयप्रक्रियेबाबत असंतोष असल्याने त्यांनी भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे. यावेळी आ. सचिन कल्याणशेट्टी, गुरुशांत धुत्तरगावकर, प्रथमेश कोठे, विनायक कोंड्याल, चेतन गायकवाड आदी उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी नव्याने प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांचे स्वागत करत आगामी महापालिका निवडणुकीत भाजपच सत्ता स्थापन करेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

### आणखी काही नेते वेटींगवर

अर्ज भरण्याची अंतिम मुदत जवळ येत असताना आणखी काही धक्कादायक इनकमिंग भाजपमध्ये होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आणखी काही पक्षातील प्रमुख नेते वेटींगवर आहेत. एकंदरित महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोलापूरचे राजकारण दिवसेंदिवस अधिक तापत असल्याचे चित्र आहे.

# सर्वपक्षांच्या मुलाखती संपल्या

## इच्छुकांच्या नजरा आता उमेदवारीकडे

सोलापूर/प्रतिनिधी

महायुती आणि महाविकास आघाडीसह प्रमुख राजकीय पक्षांनी आपल्या इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या आहेत. आता उमेदवारी अर्ज भरण्यासही सुरूवात झाली आहे. आता सर्वपक्षीय इच्छुकांच्या नजरा उमेदवारी जाहीर होण्याकडे लागल्या आहेत. दुसरीकडे, राज्य आणि केंद्रात सत्तेत असलेल्या भाजपचा रस्ता अनेकांनी धरला आहे, तर भाजपमधील नाराजांना गळ घालण्याचा प्रयत्न शिंदेसेना आणि राष्ट्रवादीकडून सुरू आहे, त्यामुळे भाजपमधील निष्ठावंतांना आयत्या वेळच्या पक्षातील इनकमिंगचे टेन्शन सतावत आहे.

मागील चार वर्षांपासून महापालिकेची निवडणूकच झालेली नाही. त्यामुळे महापालिकेत नगरसेवक म्हणून निवडून जाण्याची मनोकामना ठेवून जोरदार तयारी करणाऱ्यांची संख्या वाढली आहे. राष्ट्रवादी आणि शिवसेना या दोन राजकिय पक्षांमध्ये उभी फूट पडल्याने वेगवेगळे पक्ष निर्माण झाल्याने जास्तीत जास्त इच्छुकांना निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची संधी मिळणार आहे. शहरात सध्या तरी भाजपा स्वबळाचा नारा देत आहे. मात्र वरून युती करण्याचे संकेत मिळत आहेत. तर दुसरीकडे राष्ट्रवादीशी युती न करण्याचा निर्णय झाला आहे. त्यामुळे राज्याच्या सत्तेत मांडीला मांडी लावून बसलेल्या या तिन्ही पक्षांत महापालिका निवडणुकित मात्र भाजप-शिंदेसेना विरुद्ध राष्ट्रवादी अजित पवार गट समोरासमोर उभे ठाकण्याची शक्यता आहे.

दुसरीकडे काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि उद्धवसेना हे पक्ष महाविकास आघाडीच्या माध्यमातून महापालिका निवडणुकीला सामोरे जाणार आहेत. या तिन्ही पक्षांच्या मुलाखतीही पूर्ण झाल्या आहेत. मात्र त्यांच्याकडूनही उमेदवारीची घोषणा झाली नाही. या तिन्ही पक्षांचे लक्ष भाजपमधील बंडखोरांवर असणार आहे.

या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर भाजप व अजित पवारांची राष्ट्रवादी यांच्यासह शहरातील सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी आपल्या इच्छुकांच्या मुलाखतींचा कार्यक्रम पूर्ण केला आहे. भाजपकडून तीन ९०० इच्छुकांच्या मुलाखती घेण्यात आल्या, तर अजित पवार राष्ट्रवादीकडून ४५० इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या आहेत. २५० मुलाखती काँग्रेसने घेतल्या आहेत. उद्धव सेना आणि माकपच्या मुलाखती झाल्या आहेत. त्यामुळे शहरातील जवळपास सर्वच प्रमुख राजकीय पक्षांच्या मुलाखती संपलेल्या आहेत. आता महापालिका निवडणुकीचा अर्ज भरण्यासाठी आता तीनच दिवस राहिल्याने मुलाखती दिलेल्या सर्व पक्षांच्या सर्व इच्छुकांच्या नजरा उमेदवारी याद्या जाहीर होण्याकडे लागल्या आहेत.




# अजितदादा राष्ट्रवादीची तयारी

## उद्या मोहोळमध्ये कार्यकारिणीची बैठक

सोलापूर/प्रतिनिधी



आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, सोलापूर जिल्ह्याची महत्त्वपूर्ण जिल्हा कार्यकारिणी बैठक शुक्रवार (ता. २६) सकाळी १० वाजता सावली निवास,मोहोळ येथे आयोजित करण्यात आली असल्याची माहिती सोलापूर जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी दिली आहे.

या बैठकीमध्ये आगामी निवडणुकांसाठी पक्षाची रणनीती, संघटनात्मक मजबुती, बूथ पातळीवरील तयारी, तसेच कार्यकर्त्यांची जबाबदारी व इच्छुक उमेदवार यावर सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे.

याच बैठकीदरम्यान जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी इच्छुक उमेदवारासाठी मागणी अर्ज उपलब्ध केले जाणार आहेत.यामध्ये जिल्हा परिषद पुरुष उमेदवारासाठी २००० रू महिला व राखींव उमेदवारांना १००० रु तसेच पंचायत समिती इच्छुक उमेदवारासाठी १००० रू व महिला व राखींव जागेसाठी ५०० असे अर्जशुल्क असेल. त्यामुळे निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या पदाधिकाऱ्यांनी, कार्यकर्त्यांनी आवश्यक कागदपत्रांसह या बैठकीस उपस्थित राहावे,असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने करण्यात आले आहे.

या बैठकीस सोलापूर जिल्ह्याचे जेष्ठ नेते बळीराम साठे,माजी माजी आमदार संजयमामा शिंदे,प्रदेश प्रतिनिधी कल्याणराव काळे,कौशिक तात्या गायकवाड,लतिफ तांबोळी, बाळासाहेब बंडगर,रामेश्वर मासाळ यांच्या सहप्रमुख जिल्हा कार्यकारिणी सदस्य,तालुकाध्यक्ष, शहर अध्यक्ष, विभागीय पदाधिकारी तसेच पक्षाचे प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून, आगामी निवडणुकांच्या दृष्टीने ही बैठक अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

सर्व तालुक्यातील पदाधिकारी यांच्या बैठका पार पडतील. सदर बैठकीसाठी सर्व तालुका कार्यकारीणी, जिल्हा कार्यकारिणी, प्रदेश पदाधिकारी, सर्व फ्रंटल व सेलचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणे अपेक्षित आहे.

### बैठकीसाठी तालुकानिहाय वेळापत्रक

- माढा : सकाळी १०:०० वाजता
- दक्षिण सोलापूर : सकाळी १०:३० वाजता
- उत्तर सोलापूर : सकाळी ११:०० वाजता
- पंढरपूर : सकाळी ११:३० वाजता
- करमाळा : दुपारी १२:०० वाजता
- अक्कलकोट : दुपारी १२:३० वाजता
- मंगळवेढा : दुपारी ०१:०० वाजता
- बार्शी : दुपारी ०१:३० वाजता
- सांगोला : दुपारी ०२ : ०० वाजता
- मोहोळ : दुपारी ०२: ३० वाजता
- माळशिरस : दुपारी ०३:०० वाजता

# ब्राह्मण समाजाने वाढवलं भाजपसह इतर राजकीय पक्षांचे टेन्शन; नवा पर्याय निवडण्याच्या तयारीत

## पुण्याच्या राजकारणात मोठी घडामोड

पुणे/प्रतिनिधी

आगामी पुणे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ब्राह्मण संघटनांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. पुणे शहरात १६ ते १८ टक्के ब्राह्मण समाज असून त्यानुसार सर्वच राजकिय पक्षांनी प्रतिनिधित्व दिले नाहीत तर वेगळा निर्णय घेण्यात येईल, असा इशारा ब्राह्मण समाजाच्या संघटनांनी दिला आहे.

पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेमध्ये बोलताना विश्वजीत देशपांडे म्हणाले, सकल ब्राह्मण समाजाच्या समन्वय समितीची बैठक दोन दिवसापूर्वी संपन्न झाली. त्यामध्ये काही निर्णय घेण्यात आले आहेत. त्यानुसार आमच्या समन्वय समितीच्या सदस्यांनी राजकिय पक्षांच्या नेत्यांना भेटू आणि निवेदन देऊन काही विनंत्या केल्या आहेत.

पुणे शहरामध्ये ब्राह्मण समाजाची लोकसंख्या ही १६ ते १८७ आहे. त्यामुळे १० ते १२ प्रभागांवर आमचे प्राबल्य असून त्या प्रभागांमध्ये ब्राह्मण समाजाच्या उमेदवारांना संधी दिली जावी ही आमची मागणी आहे. तसेच ज्या खुल्या प्रवर्गाच्या जागा आहेत. त्या ठिकाणी आरक्षित प्रवर्गातील उमेदवार दिले जाऊ नये. त्यामुळे या खुल्या जागांच्या माध्यमातून शहरांमध्ये ३० ब्राह्मण समाजाचे उमेदवार दिले जाऊ शकतात. त्यानुसार ब्राह्मण समाजातील सक्षम उमेदवारांची यादी आम्ही तयार केली असून ती राजकिय पक्षांना दिली आहे. नगरपालिकांचा विचार केल्यास ब्राह्मण समाजाचे पाच उमेदवार हे नगराध्यक्ष झाले आहेत. तसेच ५० हून अधिक उमेदवार नगरसेवक झाले आहे. त्यामुळे ब्राह्मण समाजाची किती ताकद आहे हे समोर आला आहे.




पूर्वी पुणे शहरामध्ये ब्राह्मण समाजाचे २२ नगरसेवक होते. त्यानंतर ती संख्या १६ वर आली आणि मागील निवडणुकत फक्त आठ ब्राह्मण समाजाचे नगरसेवक होते. ती आणखी कमी होऊ नये त्यामुळे संख्येच्या प्रमाणात ब्राह्मण समाजाला प्रतिनिधित्व देण्यात यावं अशी मागणी ब्राह्मण समाजा कडून करण्यात आले आहे. आमची मागणी ही सर्व राजकिय पक्षांकडे असणार आहे. आत्तापर्यंत भाजपने आमच्या समाजाला न्याय दिला आहे. मात्र यंदाच्या निवडणुकीमध्ये आमच्या समाजाचा विचार केला नाही तर समाजातील लोक निवडणूक मतदानाच्या वेळी नोटा या पर्यायाचा विचार करतील. असा इशारा देशपांडे यांनी दिला.

# भाजपच्या अतुल पवार यांचा दादांच्या राष्ट्रवादीमध्ये प्रवेश

**सोलापूर** :राज्यात काही दिवसांतच महानगरपालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्व पक्षांनी तयारी सुरू केली आहे. महायुतीनेही मोठी तयारी केली आहे. पण, महायुतीमध्येही पक्षांत्तर सुरू असल्याचे दिसत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने भाजपाला धक्का दिला आहे.

सोलापूरचे माजी जिल्हा परिषद सदस्य अतुल पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. याआधी त्यांनी भाजपामध्ये काम केले आहे. ते जिल्हा परिषदेमध्ये सदस्य होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सांगोला तालुकाध्यक्षपदी पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेनेचे माजी आमदार शहाजीबापू पाटील यांना निवडून आणण्यात त्यांचा मोठा वाटा होता. सोलापूर जिल्ह्यात पुन्हा एकदा उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या पक्षाची पकड मजबूत करण्याची तयारी करत आहे. काही दिवसांपूर्वी माजी आमदार राजन पाटील यांनी भाजपामध्ये प्रवेश केला. यामुळे मोहोळ तालुक्यात राष्ट्रवादीला मोठा धक्का बसला. काही दिवसातच जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर होणार आहे. या निवडणुकांची तयारी जोरदार सुरू आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सोलापूर जिल्हा परिषदेवर राष्ट्रवादीची पकड होती. राज्यातील नव्या राजकिय समिकरणामुळे काही नेत्यांनी पक्षांतर केल्याचे दिसत आहे.